अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ चा शपथेवर जबाब
माझे नांव — हरिष गिरीधर जंगले,
माझे वय – ७१ वर्ष , धंदा : सेवानिवृत्त
राहणार – संभाजीनगर, ता. जि. संभाजीनगर.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. सन २०१२ मध्ये मी पोलीस उप निरीक्षक म्हणुन सदर बाजार पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. मला वरिष्ठांकडुन माहिती मिळाली की, जालना जिल्हयातील दवाखान्यांवर छापा टाकण्याकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी व इतर यांच्यासोबत जायचे आहे. दि.१८.०६.२०१२ रोजी मी व इतर अधिकारी असे मस्तगड येथील शुभम हॉस्पीटल येथे गेलो. तेथे वैद्यकीय अधिकारी यांनी सोनोग्राफी मशीन, संगणक व काही कागदपत्रांची पाहणी करुन सोनोग्राफी मशीन व संगणक सिल केले. सिल केलेले सोनोग्राफी मशीन व संगणक हे निर्मल अग्रवाल यांच्या ताब्यात दिले. त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी, दोन पंच व वैद्यकीय अधिकारी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र.५६ देण्यात आलेली आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणीचा रिपोर्ट आमच्या समक्ष तयार केला. आता मला सदर रिपोर्ट दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.५८ देण्यात आलेली आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. वाय. जी. सोमानी यांच्यामार्फत सुरु–**

०२. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीपुर्वी मी न्यायालयात फाईल वाचली होती व नोट्स काढल्या होत्या. हे मला माहिती नाही की, सोनोग्राफी सेंटरवर छापा टाकण्यासाठी जायचे असल्याने संरक्षण मिळावे म्हणुन फिर्यादीने पोलीस ठाणे येथे पत्र दिले होते अथवा नाही. छापा टाकायला जाण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. स्टेशन डायरीचा उतारा फिर्यादीला दिला नव्हता. छाप्यासाठी हजर रहावे असे मला

वरिष्ठांनी लेखी आदेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, छापा टाकण्यासाठी हजर रहावे असे वरिष्ठांनी सांगितले हे मी खोटे सांगत आहे. छापा टाकण्यापुर्वी पोलीस संरक्षणाची गरज आहे अथवा नाही याची मी शहानिशा केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत तपासी पथकाचा पदसिध्द सदस्य नाही. हे म्हणणे खरे आहे की, मस्तगड व रेल्वे स्टेशन हे वेगवेगळे परिसर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मस्तगड व मंमादेवी हे वेगवेगळे परिसर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तपासी पथकाने माझ्यासमक्ष संगणक व कागदपत्रांची तपासणी केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तपासी पथकाने कोणते कागदपत्रे व रजिस्टरची तपासणी केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासणी केलेले कागदपत्रे व रजिस्टर तपासणी करुन आरोपीकडे दिले होते. हे मला आठवत नाही की, तपासी पथकाने सोबत काही कागदपत्रे घेतली होती अथवा नाही. हे मला माहिती नाही की, तपासणी झाल्यानंतर फिर्याद दाखल करेपर्यंत तपासी पथकाने आरोपीकडे काही कागदपत्रांची मागणी केली होती अथवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणताही कागद तयार करण्यात आला नाही.

०३. आता मला नि.क्र.५८ वरील अहवाल दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अहवाल काळया शाईने लिहिला आहे व आमच्या सहया निळया शाईमध्ये आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर अहवालावर मी नंतर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पंचनामा व अहवाल तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वैद्यकीय अधिकारी यांना मदत करण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

(सि. म. पाडोळीकर)

दि. ०२.०२.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.